# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

क्रमांक : एमजीसी/एफ/५१६५. दि.२९.१०.२००५.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये विविध मार्गांनी दररोज सुमारे ७,५०० टन कचरा निर्माण होतो. या कचऱ्याची मुंबईतील देवनार, मुलुंड आणि गोराई या क्षेपणभूमींवर भराव पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येत असली तरी देखील या क्षेपणभूमींची कचरा सामावून घेण्याची क्षमता देखील संपत आलेली आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन प्रशासनाने कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या हेतूने व त्याचा पुनर्वापर करण्याच्या उद्देशाने त्यापासून खत निर्मिती करण्याकरीता ओल्या कचऱ्याद्वारे खत निर्माण करण्याचा प्रकल्प राबविण्याचे ठरविले. या प्रकल्पांतर्गत सध्या चौदा बिनसरकारी संस्था (एन.जी.ओ.) महापालिकेकडून ओला कचरा घेऊन त्याद्वारे खत निर्मिती करीत आहेत. तसेच संबंधित विभागाच्या विविध प्रवर्गातील प्रशिक्षित कर्मचारी देखील स्वेच्छेने त्यांच्या कार्यक्षेत्रात लहान प्रमाणामध्ये खत निर्मिती करीत आहेत.

अशा प्रकारे ओल्या कचऱ्यातून जैविक विघटनशील प्रक्रिया करुन खत निर्मिती करणाऱ्या संस्थांना सध्या त्यांच्या खताच्या विक्रीसाठी भेडसावणाऱ्या समस्येचे निराकरण करण्यासाठी त्याचप्रमाणे सदर खताचा वापर महापालिकेची उद्याने, मैदाने, करमणूक मैदाने, वृक्षारोपण, रोपवाटिका यांच्यासाठी करता येऊ शकेल या उद्देशाने, उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी, वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान यांच्याकडे ज्यांनी नोंदणी केलेली आहे अशा संस्थांकडून प्रति किलोग्रॅम रुपये ६.०० या आधारभूत दराने खताची खरेदी करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतलेला आहे. खताचा तपशिल, दर्जा व याबाबतीतील इतर अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-

<u>तपशिल (Specification)</u>

१) रंग - गडद बदामी मातीचा वास असलेला.

२) पोत (Texture) :

४ मी.मी. चाळणीतून सहज जाईल असे दाणेदार व दगड, काच, प्लास्टीक, धातू इत्यादींसारखे कण नसलेले, गवत, रानकिडे इत्यादीसारखा कचरा नसलेले, दूषित, भेसळयुक्त नसलेले व गंधविरहीत असावे.

३) समाविष्ट घटक लघुत्तम प्रमाणात :-

| घटक | टक्केवारी |
|---|---|
| अ) आर्द्रता | २५% |
| ब) नायट्रोजन | १ ते २% |
| क) फॉस्फरस | ०.४ ते १% |
| ड) पोटॅश | ०.२ ते १% |
| इ) पी.एच.(सामू) | ६.५ ते ८% |
| एफ) टिबीसी | १०८ ते १०९ (प्रत्येक ग्रॅममध्ये) |
| जी) टिएफसी | १०४ ते १०५ (प्रत्येक ग्रॅममध्ये) |

<u>४) इतर अटी व शर्ती :</u>

अ) नमुना : खताच्या दर्जाची मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत नमुना तपासणी केल्यानंतरच खत स्वीकारले जाईल.

(कृ.मा.प.)...

ब) पोहोच : २५ कि.ग्रॅ. च्या व्यवस्थित बंद केलेल्या बॅगांमधून.

क) प्रत : उत्तम दर्जाची

ड) किंमत : रुपये ६.०० प्रति कि.ग्रॅ. (सर्व कर, वाहतुक, चढ उतार यांसह)

उपरोक्त अटी, शर्ती व गुणवत्तेनुसार मुंबई महापालिकेस कचऱ्यावर जैविक विघटनशील प्रक्रिया करुन तयार केलेले खत पुरविणाऱ्या संस्था/व्यक्ती यांनी सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्ये संपूर्ण माहिती भरुन त्यांची नोंदणी उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी, वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान, डॉ. आंबेडकर मार्ग, भायखळा, मुंबई-४०० ०२७ यांच्या कार्यालयात करणे आवश्यक आहे. खताचा पुरवठा स्वीकारण्यापूर्वी खताची नमुना तपासणी खालीलपैकी एका प्रयोगशाळेमधून केली जाईल व या तपासणीचे शुल्क संबंधित संस्थेस/व्यक्तीस भरावे लागेल.

प्रयोगशाळांची नावे व पत्ते : १) मायक्रोबायलॉजिकल कंन्सल्टंट्स,
वासिममुल बिल्डींग, १ला मजला,
शौकत अली मार्ग, मुंबई-४०० ००७.

२) गडार्क लॅब प्रा.लि.
१५, हिंदुस्थान कोहिनुर इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स,
एल.बी.एस.मार्ग, विक्रोळी(प),
मुंबई-४०० ०८३.

३) इटालॅब प्रा.लि.
मेहेर हाऊस, १५ कावसजी पटेल मार्ग,
मुंबई-४०० ००१.

अतएव, सर्व खाते प्रमुख, सहाय्यक आयुक्त यांना याद्वारे अशी विनंती करण्यात येते की, त्यांनी या परिपत्रकास व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी व कचऱ्यावर जैविक विघटनशील प्रक्रिया करुन खत निर्मिती करीत असलेल्या संस्था/व्यक्ती यांना त्यांच्या प्रकल्पाची नोंदणी उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या वर नमूद केलेल्या कार्यालयात करण्यासाठी प्रवृत्त करावे.

**सही/-**
**उद्यान अधीक्षक व**
**वृक्ष अधिकारी**

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त (शहर)**

क्रमांक : उअउ/वृप्रा/मंआ/८४५, दिनांक : २३.११.२००५

प्रमुख अभियंता(घ.क.व्य.)
सहाय्यक आयुक्त ए ते टि विभाग

माहिती व पुढील योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित.

उद्यान अधीक्षक व
वृक्ष अधिकारी

D.L.TO M3/ S.O.Doc/111104/31
modi/23115

# अर्जाचा नमुना

प्रति,
उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी
वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
भायखळा, मुंबई-४०० ०२७.

विषय : कचऱ्यावर जैविक विघटनशील प्रक्रियाद्वारे
खत निर्मिती प्रकल्पासाठी नोंदणी करण्याबाबत.

महोदय,

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये माझा कचऱ्यावर जैविक विघटनशील प्रक्रियाद्वारे खत निर्मितीचा प्रकल्प असून मी खत मुंबई महानगरपालिकेस पुरवू इच्छित आहे. माझ्या प्रकल्पाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

१. संस्थेचे / व्यक्तीचे नांव :
२. संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक :
३. कचऱ्यावर जैविक विघटनशील प्रक्रियाद्वारे खत निर्मिती प्रकल्पाची स्थापना : दिनांक
४. कचऱ्यावर जैविक विघटनशील प्रक्रियाद्वारे खत निर्मिती प्रकल्प : खाजगी/
महानगरपालिकेचा अनुदानित
५. कचऱ्यावर जैविक विघटनशील प्रक्रियाद्वारे खत निर्मिती प्रकल्पाची उत्पादन क्षमता :

उपरोक्त माहिती ही सत्य असून महानगरपालिकेच्या अटी, शर्ती व गुणवत्तेनुसार मी गांडूळ खत मुंबई महानगरपालिकेस पुरवू इच्छित आहे. तेव्हा माझ्या प्रकल्पाची नोंदणी करुन घ्यावी ही विनंती.

आपला,

(संस्थेचे/व्यक्तीचे नांव, सही व
संस्थेच्या नावाचा रबरी शिक्का)

ठिकाण :
दिनांक :